**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
क्रमांक - रानिआ/मनपा/२०१२/प्र.क्र. ११/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- १३/०२/२०१२.

## प रि प त्र क

महानगरपालिकेच्या सदस्य पदाच्या निवडणुकीमध्ये उमेदवाराने निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे ठेव म्हणून जमा करावयाच्या अनामत रकमेबाबत संबंधित अधिनियम/नियमांमध्ये महिला उमेदवारांच्या संदर्भात पुढीलप्रमाणे तरतूद आहे:-

**"परंतु, उमेदवार अनुसूचित जातीचा, अनुसूचित जमातीचा, नागरिकांच्या मागासवर्गाचा किंवा महिला असेल तर, ही अनामत रक्कम दोन हजार पाचशे रुपये इतकी असेल."**

अधिनियम/नियमांमध्ये वरीलप्रमाणे स्पष्ट तरतूद असूनही काही निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी महिला उमेदवारांकडून रुपये पाच हजार एवढी रक्कम अनामत म्हणून घेतली असल्याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

वरील परिस्थितीत माहे फेब्रुवारी-२०१२ मध्ये होणाऱ्या महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये ज्या महिला उमेदवारांकडून रुपये पाच हजार एवढी रक्कम अनामत म्हणून घेण्यात आलेली असेल त्यांना रुपये दोन हजार पाचशे एवढी रक्कम तात्काळ परत करण्यात यावी. तसेच यापुढे होणाऱ्या महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये अधिनियम/नियमातील तरतुदीनुसार अनामत रक्कम घेतली जाईल याची दक्षता घेण्यात यावी अशा सूचना संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना देण्यात याव्यात.

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त

D:\Letter for Code of Conduct. Punedoc.doc/D.O.7